# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/04/2023 (गुरूवार) दुपार

---

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. बेला :– अंतर्गत १२ कि.मी अंतरावरील ऑन दी रॉक हॉटेल चिमनाझरी शिवार येथे दिनांक १८/०४/२०२३ चे १६/३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– मोहम्मद नजीम मोहम्मद कयुम शेख वय ४५ वर्षे रा. मोठा ताजबाग नागपुर याने कान्हा साठे याचे हॉटेल ऑन दी रॉक येथे पेटींगचे काम घेतले असुन घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा मजुरासह पेटींग करीत असता अचानक हॉटेल समोर गाडी क्र. MH 31 CR 2951,MH 26QU 925 ,MH 31 CP 9575 मध्ये अज्ञात ५ ते ७ ईसम येवुन फिर्यादीस धमकावुन म्हणाले की तु कोण आहे कसा काम करीत आहे असे म्हणुन फिर्यादीचे गालावर दोन तीन थापडा मारल्या व हॉटेलचे सामानाचे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२३, ५०६, ४२७, १४३, १४७, १४९ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ अजय चौधरी ब. नं ६८६ मो. क्र. ९०२२८४९५८० हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत केसलापुर येथे दिनांक १९/४/२०२३ चे ०७/०० वा. ते ०८/०० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे– रमेश सिंग, रा. केसलापुर** हा नेहमी लहान मुले घरासमोर खेळण्याच्या कारणावरून शिवीगाळी करीत असतो. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी आरोपी हा फिर्यादी नामे– पॅरेलाल गणेश गायकवाड, रा. केसलापुर यांच्या घरासमोर येवुन शिवीगाळ करीत असता दुपारी फिर्यादीने त्याला हटकले तेव्हा आरोपी पुन्हा वाद करून शिवीगाळी करून विट फिर्यादीच्या डोक्यावर मारून फिर्यादीला जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ ४५ देशमुख मो. क्र. ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर